पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

मा. ह प्रभाग मासीक सभा

कार्यपत्रिका क्रमांक – ९
सभावृत्तांत

दिनांक – ०१ / ११ / २०१८ वेळ. दुपारी १२.०० वाजता

................................................................................................................................

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. ह प्रभाग समिती मासिक सभा गुरुवार दिनांक ०१/११/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता ह क्षेत्रीय कार्यालयातील "पं.दीनदयाळ उपाध्याय सभागृहात" आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य / सदस्या उपस्थित होते.

| अ.क्र. | सन्मा.सदस्य नांव | |
|---|---|---|
| १ | मा. कांबळे अंबरनाथ चंद्रकांत | सभापती |
| २ | मा. सुलक्षणा राजू धर | सदस्या |
| ३ | मा. शाम गणपतराव लांडे | सदस्य |
| ४ | मा. सुजाता सुनिल पालांडे | सदस्या |
| ५ | मा. बनसोडे राजू विश्वनाथ | सदस्य |
| ६ | मा. आशा धायगुडे – शेंडगे | सदस्या |
| ७ | मा. काटे स्वाती (माई) चंद्रकांत | सदस्या |
| ८ | मा. राजापुरे माधवी राजेंद्र | सदस्या |
| ९ | मा. चौगुले सीमा दत्तात्रय | सदस्या |
| १० | मा. संजय गुलाब कणसे | स्विकृत सदस्य |
| ११ | मा. ज्ञानेश्वर मुरलीधर थोरात | स्विकृत सदस्य |

याशिवाय श्रीम.आशा राऊत प्रशासन अधिकारी तथा क्षेत्रीय अधिकारी, श्री.केशवकुमार फुटाणे (कार्य. अभियंता स्था), श्री.रामदास तांबे (कार्य. अभियंता पापु), श्री.संजय भोसले (कार्य. अभियंता जनि), श्री.विजयसिंह भोसले (उप अभियंता स्था), श्री.दिलीप धुमाळ (उप.अभियंता वि), श्री.ऐ.बी.कोंडे (उपअभियंता जनि), श्री.काशिद संजय (उप अभियंता बी.आर.टी.एस.स्था), श्री.खोंद्रे एम.आय. (उप अभियंता झोनिपू), श्री.डी.एस.सासवडकर ( सहा. आरोग्याधिकारी ), श्री. पटेल जे.व्ही. (सहा.उद्यान अधिक्षक), श्री.जाधव शंकर (वैद्यकिय उ.अधिक्षक), श्री.देशमुख मनोज (वैद्यकिय अधिक्षक), श्री.संतोष लांडगे (उद्यान सहाय्यक), श्री.जाधव अजय (मु.आ.नि.),श्री.कोटीयाना डी.एम.आ.नि.पशुवैद्यकिय), श्री.दांगडे एस.डी.( क.अ.स्था), श्री.महेंद्र देवरे (क.अ.स्था), श्री.सानप एस.एस. (क.अ.स्था), श्री. खरटमोल एम.व्ही (क.अ.पापु),श्री.निलेश दाते (क.अ.पापु), श्रीम.एस.एस.कुलकर्णी (क.अ.पापु), श्री.जितीकर आर.एन. (क.अ.पापु), श्री.यादव प्रिती (क.अ.जनि ), श्री.भंडारी एम.पी. (क.अ.स्था), श्रीम.अंकिता मोरे (क.अ.स्था.उ.), श्री. समीर दळवी (क.अ.वि),श्रीम. जयश्री साळवे (क्रीडा पर्यवेक्षक), श्रीम.रश्मी तुंडलवार (आ.नि.), श्री.इंगेवाड एस.एम. (आ.नि.), श्री.उध्दव डवरी (आ.नि.), श्री.अमर जाधव (क.अ. स्था), श्री.अमित दिक्षित (क.अ.पापु), हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**मा.सभापती** – उपस्थित सन्मा.सदस्य अधिकारी / कर्मचारी सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले –**

विषय क्र.१) प्रभाग क्र.३० दापोडी ख्रिचन दफनभूमीचे कामे करणेबाबत - १. माळयाचे घर व संडास ( शौचालय) व बाथरुम बांधणेबाबत २.ऑफिससाठी ऑफिसरुम बांधणेबाबत ३.रोड लाईट (L.E.D ) जागोजागी बसविणेबाबत ४. रस्ता बनविणेबाबत ५. फुटपाथ दुरुस्त करुन ब्लॉक बसविणेबाबत ६.पिण्याचे पाण्यासाठी नळ कनेक्शन बसविणेबाबत ७. हापसा बोअरवेल करणेबाबत ८. प्रार्थना मंदीर दुरुस्त करणेबाबत ९. प्रार्थना मंदीरसाठी वायरींग कनेक्शन बसविणेबाबत १०. दफनभूमी (साईड वॉल) भिंत व प्रार्थना मंदीर रंगविणेबाबत - मा.राजू बनसोडे,मा.स्वाती (माई) काटे यांचा प्रस्ताव

विषय क्र.२) प्रभाग क्र.२० मधील लांडेवाडी झोपडपट्टीत टेल्को रस्त्या लगत नाल्याच्या बाजूला जुने पत्र्याचे छप्पर असलेले समाज मंदिर आहे. सदर समाज मंदिर जुने झाले असून छप्पर गळत असून समाज मंदिराची अवस्था बिकट झाली आहे. तरी नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीने सदर जुने समाज मंदिर पाडून त्याच ठिकाणी नवीन आर.सी.सी.समाज मंदिर बांधणे आवश्यक आहे. तरी सदर जुने समाज मंदिर पाडून नवीन आर.सी.सी. समाज मंदिर बांधणेबाबत – मा.सुलक्षणा धर, मा.शाम लांडे यांचा प्रस्ताव

विषय क्र.३) प्रभाग क्र.२० मधील लांडेवाडी झोपडपट्टी शिवाजी पुतळयामागे उद्यानाच्या भिंतीस लागून जुनी बालवाडी आहे. सदर बालवाडी जुनी झाली असून मोडकळीस आली आहे. तरी नागरिकांच्या सोईच्या दृष्टीने सदर जुनी बालवाडी पाडून त्याच ठिकाणी नवीन बालवाडी बांधणे आवश्यक आहे. तरी सदर जुनी बालवाडी पाडून नवीन आर.सी.सी. बालवाडी बांधणेबाबत मा.सुलक्षणा धर, मा.शाम लांडे यांचा प्रस्ताव

विषय क्र.४) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण मेमोरियल हॉस्पिटलच्या आवारात सुमारे २५ वर्षांपूर्वी वाहनतळ बांधण्यात आलेले आहे. सदर वाहनतळासाठी दोन आर.सी.सी. शेड बांधण्यात आलेले आहे. सदर वाहनतळाच्या जागेवर नवीन वाहनतळ सुविधेसह पदव्युतर पदवी अभ्यासक्रमासाठी वसतीगृह सुविधेसाठी नवीन इमारत बांधण्याचे नियोजन आहे, तरी सदर जुने वाहनतळाचे बांधकाम निष्कासित करणे आवश्यक आहे. तरी यशवंतराव चव्हाण मेमोरियल हॉस्पीटलच्या आवारातील दोन आर.सी.सी.वाहनतळाचे बांधकाम निष्कासित करणेबाबत – मा.शाम लांडे, मा.सुलक्षणा धर यांचा प्रस्ताव

विषय क्र.५) कासारवाडी येथील पूर्वीची भाजी मंडई पाडून नव्याने अद्यावत भाजी मंडई व भव्य हॉल उभारणेबाबत – मा.आशा धायगुडे- शेंडगे, मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव

विषय क्र.६) दिनांक ३ / ५ / २०१८ सभावृत्तांमधील ठराव क.५ विषय क्र.४ प्रभाग क्र.२० येथील गोल मंडईला "श्री.श्री.श्री. शिवछत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई" असे नांव देणेस मान्यता देणेत येत आहे. सदर मंजूर करणेत आलेल्या ठरावातील दोन श्री. वगळून एकच श्री. अशी दुरुस्ती करणेत येऊन **"श्री. शिवछत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई"** असे नांव देणेबाबत - मा.सुजाता पालांडे,मा.स्वाती (माई) काटे यांचा प्रस्ताव

विषय क्र.७) प्रभाग क्रमांक २० मध्ये फिलिप्स कंपनीजवळ शाहिद कॉ. दादा रुपमय चटर्जी पुतळा येथील चौकाला **"शाहिद कॉ. दादा रुपमय चटर्जी"** असे नांव देणेबाबत – मा.सुजाता पालांडे,मा. आशा धायगुडे-शेंडगे यांचा प्रस्ताव

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले –**

**ठराव क्र - २३**
दि - १/११/२०१८
सुचक - मा. राजू बनसोडे

**विषय क्र - १**
विभाग – स्थापत्य
अनुमोदक - मा.स्वाती (माई) काटे

संदर्भ - मा. राजू बनसोडे,मा. स्वाती (माई) काटे यांचा दि. १ / ११ / २०१८ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.३० दापोडी ख्रिचन दफनभूमीचे कामे करणेबाबत - १.माळयाचे घर व संडास (शौचालय) व बाथरुम बांधणेबाबत २.ऑफिससाठी ऑफिसरुम बांधणेबाबत ३. रोड लाईट ( L.E.D ) जागोजागी बसविणेबाबत ४. रस्ता बनविणेबाबत ५. फुटपाथ दुरुस्त करुन ब्लॉक बसविणेबाबत ६. पिण्याचे पाण्यासाठी नळ कनेक्शन बसविणेबाबत ७. हापसा बोअरवेल करणेबाबत ८. प्रार्थना मंदीर दुरुस्त करणेबाबत ९. प्रार्थना मंदीरसाठी वायरींग कनेक्शन बसविणेबाबत १०. दफनभूमी (साईड वॉल) भिंत व प्रार्थना मंदीर रंगविणेबाबत मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

**ठराव क्र - २४**
दि - १/११/२०१८
सुचक - मा. सुलक्षणा धर

**विषय क्र - २**
विभाग – स्थापत्य
अनुमोदक - मा.शाम लांडे

संदर्भ - मा. सुलक्षणा धर व मा.शाम लांडे यांचा दि. १ / ११ / २०१८ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.२० मधील लांडेवाडी झोपडपट्टीत टेल्को रस्त्या लगत नाल्याच्या बाजूला जुने पत्र्याचे छप्पर असलेले समाज मंदिर आहे. सदर समाज मंदिर जुने झाले असून छप्पर गळत असून समाज मंदिराची अवस्था बिकट झाली आहे. तरी नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीने सदर जुने समाज मंदिर पाडून त्याच ठिकाणी नवीन आर.सी.सी.समाज मंदिर बांधणे आवश्यक आहे. तरी सदर जुने समाज मंदिर पाडून नवीन आर.सी.सी. समाज मंदिर बांधणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

**ठराव क्र** - २५ | **विषय क्र** - ३
दि - १/११/२०१८ | विभाग – स्थापत्य
सुचक - मा. सुलक्षणा धर | अनुमोदक - मा. शाम लांडे
संदर्भ - मा. सुलक्षणा धर,मा.शाम लांडे यांचा दि. १ / ११ / २०१८ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.२० मधील लांडेवाडी झोपडपट्टी शिवाजी पुतळयामागे उद्यानाच्या भिंतीस लागून जुनी बालवाडी आहे. सदर बालवाडी जुनी झाली असून मोडकळीस आली आहे. तरी नागरिकांच्या सोईच्या दृष्टीने सदर जुनी बालवाडी पाडून त्याच ठिकाणी नवीन बालवाडी बांधणे आवश्यक आहे. तरी सदर जुनी बालवाडी पाडून नवीन आर.सी.सी. बालवाडी बांधणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

---

**ठराव क्र** - २६ | **विषय क्र** - ४
दि - १/११/२०१८ | विभाग –
सुचक - मा. शाम लांडे | अनुमोदक - मा. सुलक्षणा धर
संदर्भ - मा. शाम लांडे,मा.सुलक्षणा धर यांचा दि. १ / ११ / २०१८ चा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण मेमोरियल हॉस्पिटलच्या आवारात सुमारे २५ वर्षांपूर्वी वाहनतळ बांधण्यात आलेले आहे. सदर वाहनतळासाठी दोन आर.सी.सी. शेड बांधण्यात आलेले आहे. सदर वाहनतळाच्या जागेवर नवीन वाहनतळ सुविधेसह पदव्युतर पदवी अभ्यासक्रमासाठी वसतीगृह सुविधेसाठी नवीन इमारत बांधण्याचे नियोजन आहे, तरी सदर जुने वाहनतळाचे बांधकाम निष्कासित करणे आवश्यक आहे. तरी यशवंतराव चव्हाण मेमोरियल हॉस्पीटलच्या आवारातील दोन आर.सी.सी.वाहनतळाचे बांधकाम निष्कासित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

---

**ठराव क्र** - २७ | **विषय क्र** - ५
दि - १/११/२०१८ | विभाग –
सुचक - मा. आशा धायगुडे – शेंडगे | अनुमोदक - मा. सुजाता पालांडे
संदर्भ - मा.आशा धायगुडे- शेंडगे, मा.सुजाता पालांडे यांचा दि. १ / ११ / २०१८चा प्रस्ताव

कासारवाडी शास्त्रीनगर येथे जुनी भाजी मंडई आहे. सद्यस्थितीत त्याचा वापर होत नाही. वापर होत नसल्याने सदरची जुनी भाजी मंडई इमारत पाडून नव्याने अद्यावत भाजी मंडई व हॉल बांधणेचे प्रयोजन आहे. नवीन भाजी मंडईस मनपाच्या बांधकाम परवानगी विभागाची परवानगी घेऊन नवीन इमारत बांधकाम करावयाची आहे. तरी जुनी भाजी मंडई इमारत पाडून नव्याने इमारत बांधणेच्या कामास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

---

**ठराव क्र -** २८
दि - १/११/२०१८
सुचक - मा. सुजाता पालांडे
संदर्भ - मा. सुजाता पालांडे,मा.स्वाती ( माई) काटे यांचा दि. १ / ११ / २०१८ चा प्रस्ताव

**विषय क्र -** ६
विभाग – स्थापत्य
अनुमोदक - मा.स्वाती (माई) काटे

दिनांक ३ / ५ / २०१८ सभावृत्तांमधील ठराव क.५ विषय क्र.४ प्रभाग क्र.२० येथील गोल मंडईला "श्री.श्री.श्री. शिवछत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई" असे नांव देणेस मान्यता देणेत येत आहे. सदर मंजूर करणेत आलेल्या ठरावातील दोन श्री. वगळून एकच श्री. अशी दुरुस्ती करणेत येऊन **"श्री. शिवछत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई"** असे नांव देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--

**ठराव क्र -** २९
दि - १/११/२०१८
सुचक - मा. सुजाता पालांडे
संदर्भ - मा. सुजाता पालांडे,मा. आशा धायगुडे – शेंडगे यांचा दि. १ / ११ / २०१८ चा प्रस्ताव

**विषय क्र -** ७
विभाग – स्थापत्य
अनुमोदक - मा.आशा धायगुडे – शेंडगे

प्रभाग क्रमांक २० मध्ये फिलिप्स कंपनीजवळ शाहिद कॉ. दादा रुपमय चटर्जी पुतळा येथील चौकाला **"शाहिद कॉ. दादा रुपमय चटर्जी"** असे नांव देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**(मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत )**
सभापती, ह प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

जा.क्र. हक्षे / १० / कावि / १७३ / २०१८
दिनांक : २२ / ११ / २०१८

**प्रशासन अधिकारी**
**तथा**
**सचिव (सभाशाखा)**
ह प्रभाग समिती

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर